# INTERNATIONAL JOURNAL OF MULTIFACETED & MULTILINGUAL STUDIES

UGC Approved Research Journal (Sr. 47674)

Volume IV
Issue XII

ISSN : 2394-207X (Print)
IMPACT FACTOR : 4.205

December 2017

A Galaxy of Scholarly Written Research Papers/Articles

IJMMS

Cosmos

Chief Editor
Dr. V. H. Mane

Executive Editor
Prof. M. P. Shaikh

www.ijmms.in | Email : ijmms14@gmail.com

VOLUME-IV, ISSUE-XII

ISSN (Print): 2394-207X
IMPACT FACTOR: 4.205
INTERNATIONAL JOURNAL OF MULTIFACETED AND MULTILINGUAL STUDIES

# TITLE: INTERNATIONAL JOURNAL OF MULTIFACETED AND MULTILINGUAL STUDIES

UGC Approved Research Journal (Sr. 47674)

Editors: Dr. V.H. Mane, Prof. M. P. Shaikh

Language: Multilingual

Published by

INTERNATIONAL JOURNAL OF MULTIFACETED AND MULTILINGUAL STUDIES

Sneh Apartment,
Flat No. 001, Samarth Nagar, New Sangvi,
Pune- 411027

Copyrights: Editors 2014

All rights reserved

ISSN: 2394-207X (Print)
IMPACT FACTOR: 4.205

VOLUME-IV, ISSUE-XII

December -2017

| | | | |
|---|---|---|---|
| ३६ | कृषी, आपत्ती व्यवस्थापन व औघोगिकरणाचा पाया भक्कम करणारा नेता मा. शरदचंद्र पवार | डॉ. रमेश एस. देसाई | १५४-१५७ |
| ३७ | शरद पवारांनी कृषी क्षेत्रासंबंधी केलेले प्रयोग | डॉ. विलास पाटील | १५८-१६१ |
| ३८ | 'अॅड-राम कांडगे लिखित' लोकनेते शरदरावजी पवार या ग्रंथाचे एक अवलोकन आणि आकलन | संतोष पद्माकर पवार | १६२-१६४ |
| ३९ | राजकीय क्षेत्रातील शरद पवारांचे योगदान | प्रा. सतीश उढाण | १६५-१६७ |
| ४० | आदरणीय शरदचंद्र पवारांचे सहकारातील योगदान | प्रा. शरदकुमार उत्तम शेटे | १६८-१७२ |
| ४१ | प्रभावी व अनुभवी नेतृत्व: शरद पवार | प्रा. ओंकार नरेंद्र केने | १७३-१७५ |
| ४२ | महिला सबलीकरणामध्ये शरद पवार यांचे योगदान | प्रा. ज्ञानेश्वर खोडवे | १७६-१७९ |
| ४३ | शरदचंद्र पवार यांचे कृषिक्षेत्रातील योगदान | प्रा. लोहगावकर जयश्री | १८०-१८४ |
| ४४ | आधुनिक भारताच्या विकासात शरदपवार यांचे योगदान: विशेष संदर्भ महाराष्ट्राच्या राजकारणाची अभिजन चौकट | राजकुमार सुरवसे | १८५-१८६ |
| ४५ | सकलजनवादी नेतृत्व शरद पवार | वैशाली प्रकाश पवार | १८७-१९१ |
| ४६ | पुलोद सरकार आणि शरद पवार यांची भूमिका | प्रा. सुपेकर वैशाली प्रशांत | १९२-१९४ |
| ४७ | मा. शरद पवार: व्यक्तिमत्त्व वैशिष्टये आणि नेतृत्व शैली | प्रा. सुनंदा हेळकर | १९५-१९७ |
| ४८ | शरद पवार यांची सामाजिक न्यायवादी भूमिका - विद्यापीठ नामांतर संदर्भात | डॉ. निशा सिताराम मोरे | १९८-२०२ |
| ४९ | कृतीशील व्यक्तिमत्व:शरदराव पवार साहेब | चंद्रकांत पांडूरंग सरगर | २०३-२०४ |
| ५० | बहुआयामी लोकनेता: शरद पवार | डॉ. मीना ठाकूर | २०५-२०६ |
| ५१ | शरद पवारांचे महिला सक्षमीकरणात योगदान | प्रा. राजकुमार बबन रिकामे | २०७-२१० |
| ५२ | महिला सक्षमीकरणास शरद पवारांचे योगदान | प्रा. माधुरी सावंत | २११-२१२ |
| ५३ | शरदचंद्र पवार यांचे महिला सबलीकरण धोरण | प्रा. भाऊसाहेब खंडु सांगळे | २१३-२१४ |

# शरदचंद्र पवार यांचे महिला सबलीकरण धोरण

प्रा. भाऊसाहेब खंडु सांगळे
इतिहास विभागप्रमुख
अ. आ. कॉलेज मंचर, जि. पुणे

**प्रस्तावना :** महात्मा ज्योतीराव फुले हे स्त्री मुक्ती आंदोलनाचे जनक व स्त्री–स्वातंत्र्याचे उद्गाते होते. त्यांच्या या कार्यात त्यांची पत्नी क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले यांनी मोठ्या त्यागाने व कष्टाने साथ दिली. फुलेयांनी स्त्रियांसाठी शाळा उघडणे, सावित्रीबाईना त्याशाळेत शिक्षिकानेमणे, विधवांच्या केशवपना विरुद्ध आंदोलन करणे, बालहत्या प्रतिबंधक गृहाची स्थापना करणे, विधवांसाठी प्रसुतीगृह उभारणे, विधवांच्या पुर्नविवाहास चालना देणे इ. उपक्रमातून स्त्री–मुक्तीची मोठी चळवळ उभारली होती. त्यांचा आदर्श डोळ्या समोर ठेवून शरदपवारांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाल्यावर २२ जून १९९४ रोजी सर्वकष महिला धोरण जाहीर करून ह्या देशात प्रथम महाराष्ट्रात महिलांना सर्व क्षेत्रात विकासाचा नवा मार्ग मोकळा करून दिला.

**क्रांतीकारी महिला विकास धोरण :** महात्मा फुले यांच्यास्त्री–पुरुष समानते च्या विचारांना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मान्यता देऊन भारता च्या संविधानात स्त्री–पुरुष भेद न ठेवता समानतेचे तत्त्व हा नागरिकांचा मूलभूत हक्क मानण्यात आला आहे. असे जरी असले तरी सर्वांगीण विकासा पासून स्त्री वर्ग हा बाजूलाच राहिला होता. जीवना च्या सर्वच क्षेत्रात स्त्रिया अपवाद वगळता उपेक्षित होत्या. स्त्री वर्गाच्या सर्वांगीण विकासासाठी व उद्धारासाठी शरद पवार यांनी केलेल`कार्य समाज परिवर्तनाच्यादृष्टीने युगप्रवर्तक ठरते. दि. २२ जून १९९४ रोजीत्यांनी भारतातील सर्व प्रथम समाज परिवर्तनवादी व क्रांतीकारी महिला धोरण जाहीर केले की, ज्यामुळे महाराष्ट्रातील महिलां च्या जीवनात विकासाची, कर्तृत्वाची व समान संधीची नवी पहाट उजाडली. महिला धोरण आखताना समाजातील विविध क्षेत्रांत महिला विकासासाठी काम करणाऱ्या संस्थांशी व व्यक्तींशी संपर्क साधला. त्यांच्याशी चर्चा करून महिलांच्या सर्वांगीण विकासा कडे वाटचाल करणारे धोरण त्यांनी मोठ्या अभ्यासू वृत्तीने आखले व स्त्रीस्वातंत्र्याचा कार्यक्रम म्हणून जाहीर केला. त्यांच्या धोरणात स्त्री पुरुष समानता, महिलांचे सबलीकरण, सर्व क्षेत्रांमध्ये महिलांचा सक्रिय सहभाग, बालकांवरील अत्याचारास प्रतिबंध व त्याचे निर्मुलन, महिलांच्या आरोग्यविषयक अधिकारांना मान्यता, महिला शिक्षणाकडे जाणीवपूर्वक लक्षपुरविण्याची आवश्यकता या प्रमुख बाबींचा समावेश होता. अस्तित्वात असलेल्या कायद्यांची व नियमांची छाननी करून त्यामागील लिंगभेद विषयक पूर्वग्रह दूषिततरतुदी शोधून त्यात महिलांना समानन्याय मिळविण्याच्या दृष्टीने नवीन कायेप्रस्थापितकरणेहा या क्रांतीकारी व समाजपरिवर्तनवादी महिलाविषयक धोरणाचा उद्देश होता. त्यानुसार वडिलोपर्जित संपत्तीत भावाबरोबर बहीणहीसमान हिश्याची मालक झाली. महिलाविषयक खटल्याचा निकाल, त्वरीतकरण्याचाही निर्णय घेतला गेला. स्त्रीपक्षकारांना पोटगी, मालमत्ता, हिंसा व घटस्फोट यासारख्या खटल्यांमध्ये कोर्ट फी माफ करण्याचा निर्णय घेतला. सरकारी योजनेतून इंदिरा आवास योजनेखाली बांधण्यात येणारी घरे पती–पत्नीच्या संयुक्त नावानेदेण्याचा निर्णय झाला.

**महिलांचा सामाजिक स्तरउंचावण्या चा प्रयत्न :**या महिला विषयक धोरणानुसार शासकीय, निमशासकीय, शासकीय अनुदानित संस्थांमधील सेवांमध्ये भरतीसाठी महिलांना ३०% जागांचे आरक्षण ठेवले. महिलापोलिसांना पुरुष पोलिसांसारखादर्जा देणे, महिलांनाकायदाविषयक सल्ला मोफत देणे, शासकीय अतिरिक्त जमीनवाटप करताना पती–पत्नीच्या संयुक्त नावेदेणे, झोपडपट्टीतील रहिवाशांनादेण्याचीशासकीय ओळखपत्रे संयुक्त नावेदेणे, स्थानिक स्वराज्य संस्थांच्याउत्पन्नाचा १०% भाग महिला व बालकल्याण योजनांसाठी वापरणे, महिलां वरीज़ अत्याचाराची प्रकरणे त्वरीत निकाली काढण्यासाठी विशेष न्यायालयांची स्थापना, देवदासींना निर्वाहासाठी अनुदान देणे, इत्यादी महिला उन्नती विषयक निर्णय घेवून महिलांना समाजात प्रतिष्ठा प्राप्त करून देण्यासाठी व त्यांचा सामाजिक दर्जा उंचावण्यासाठी ह्या धोरणामुळे शक्य झाले.

**महिलांच्या आर्थिक गुलामगिरीतून मुक्ततेसाठी प्रयत्न :** महिलांना आर्थिक गुलामगिरीतून बाहेरकाढण्यासाठी संघटित व असंघटित क्षेत्रातील महिलांच्यासमस्यांचे निराकरण करणारा बहुमुखी कार्यक्रम पवारांनी हाती घेतला. संघटित क्षेत्रात दिवसभराची बालसंगोपन केंद्रे व पाळणाघरे स्थापन करण्यात आली. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांना ३३% प्रतिनिधीत्व देण्यात आले. पोलिस पाटलांची ३३% पदे आरक्षित करण्यात आली.

असंघटित क्षेत्रामध्ये महिला आर्थिक विकास महामंडळाची स्थापना करण्यात आली. गरजू व होतकरू महिलांनात्यांच्या उद्योगांसाठी महामंडळा कडून अर्थ सहाय्य देण्यात येवू लागले. स्वयंरोजगारातून पैसा मिळविण्याच्या क्षमतेत भरीव वाढ व्हावी,म्हणून कामधेनू योजना कार्यान्वित करण्यात आली. नोंदणीकृत महिला संस्थांकडून त्यांनी उत्पादित केलेल्या वस्तुंची शासना मार्फत खरेदी होवू लागली. औद्योगिक वसाहतीत गाळे वाटताना महिलांना प्राधान्य, फळे, भाजी, मासळी, मटण बाजारात महिला विक्रेत्यांना गाळे वाटपात प्राधान्य देण्यात आले. गाव पातळीवर अंगणवाडी कार्यक्रम हा महिला विकासाचा केंद्रबिंदू ठरला तसेच महिला बचत गट स्थापन करण्यात आले.

**महिलांसाठी प्रौढसाक्षरता उपक्रम :** ज्या स्त्रिया निरक्षर आहेत व ज्यांनी लवकर शाळा सोडून दिली. त्यांच्यासाठी ग्रामपातळी वर अंगणवाडी केंद्राचा वापर महिला केंद्र म्हणूनकेला. त्यामध्ये साक्षरते बरोबरच आरोग्य विषयक सल्लेही दिलेजावूलागले.

**मुलींच्या शिक्षणासाठी प्रोत्साहन :** शिक्षण मधूनचसोडलेल्या मुलींसाठी व अनुत्तीर्ण तसेच शिक्षणात कमकुवतअसणाऱ्या मुलींसाठी विशेष शिकवणी वर्ग, मुलींची शिक्षणातील गळती थांबविण्यासाठी त्यांना उपस्थिती भत्ता देण्याचाही महत्त्वपूर्ण निर्णय पवारांनी या महिला विषयक धोरणा नुसार घेतला.

**उच्च–तंत्र शिक्षणात मुलींना आरक्षण :** उच्च तंत्र शिक्षण घेणाऱ्या मुलींसाठी २५% जागाआरक्षित ठेवण्याचा निर्णय घेतलागेला. तसेच या मुलींसाठी टप्प्याटप्प्या नेवसति गृहे बांधूनत्यांना निरनिराळ्याशैक्षणिक सुविधाउपलब्धकरूनदेण्याचाप्रयत्नझाला. इ. १२ वी पर्यंत शिक्षणघेणाऱ्या मुलींनाएस.टी.पास मोफत करण्यातआला.

**महिलांचे आरोग्य :** स्त्रियांच्या आरोग्य विषयक सर्व बाबीं वर तसेच किती मुले व्हावीत हे ठरविण्याचा अधिकार या धोरणाने महिलांना दिलागेला. स्त्री–पुरुष यांना आरोग्यविषयक समान सुविधा पुरविण्याचा तसेच स्त्रियांना लैंगिक व जननविषयक आरोग्याकडे अधिक लक्ष देणाऱ्या कार्यक्रमांचा समावेश या धोरणात केला गेला.

**बालमृत्यू व माता मृत्यूचे प्रमाण कमी करण्याचा प्रयत्न:** महिला विषयक धोरणात महाराष्ट्रातील बाळ व माता मृत्यूंचे प्रमाण कमी करण्याकडे लक्ष देण्याचा निर्णय घेतला गेला. सर्व आदिवासी उपाययोजना क्षेत्रांमधील प्रत्येक गावांमध्ये सुरक्षित प्रसुति सेवा उपलब्ध करून देण्यासाठी पारंपरिक प्रशिक्षण देण्याचा निर्णय या धोरणा घेतला गेला. वयात येणाऱ्या मुलीं चे शारीरिक व मानसिक आरोग्या संदर्भात शालेय अभ्यासक्रमात समावेश करण्याचा निर्णय घेण्यात आला.

**पोषण आहारहा मूलभूत आरोग्याचा पाया :** स्त्रियांना नेहमी पुरेसा पोषण आहार दिलाजावा, यासाठी विशेष प्रयत्न करण्याचा निर्णय या धोरणात घेतला गेला. कारण पोषण आहार मिळणे हा स्त्रीच्या एकंदर विकासाशी संबंधित व महत्वाची बाब मानलीगेली.

**समारोप :**शरद पवारांनी जून १९९४ मध्ये स्त्रियांच्या सर्वांगीण विकासासाठी व त्यांच्या कडून देशाच्या समृद्धी साठी समाज परिवर्तनवादी व क्रांतीकारी महिला विषयक धोरण जाहीर केले व आपल्या दुरदृष्टीची जाणीव देशाला करून दिली. देशात सर्वप्रथम महिलांना राजकीय, आर्थिक व सामाजिक प्रतिष्ठा दिली. स्त्री व पुरुषहा भेद दूर करण्याचा, समानता आणण्याचा व स्त्रियांना आर्थिक सुस्थितीत आणण्याचा प्रयत्न करणे हे धोरण अंमलात आणल्याने झाला असे म्हणता येईल. निरनिराळ्या क्षेत्रात कर्तृत्वाची झलक महिला दाखवू शकतील, स्वत:ची प्रगती करू शकतील. त्यांच्यात सामर्थ्य येईल व त्यासबल होतील, असे दूरदर्शीपणाचे धोरण शरद पवार यांनी राबविले की, ज्यामुळे स्त्रियांना महाराष्ट्रात प्रथम स्वायत्त व स्वतंत्रदर्जा मिळविण्यास मोठी मदत झाली. स्त्रियांच्यासर्वांगीण विकासासाठी उचललेले हे पहिले क्रांतीकारी पाऊल होते.

अॅड. कांडगेराम, 'लोकनेतेशरदपवार', राजश्रीप्रकाशन, पुणे, २०१०
पवारशरद, 'लोक माझेसांगाती', राजहंसप्रकाशन, पुणे
टकलेहेमंत, 'काटेवाडी ते नवी दिल्ली', अविष्कारप्रकाशन
शेवतेअरुण, 'आम्ही पाहिलेलेशरदपवार', ऋतुरंगप्रकाशन